३२. निबंधक व रिझर्व्ह बँक यांच्या परवानगीने समान उद्दीष्टे असलेल्या सहकारी बँकांचे विलिनिकरण करुन घेणे, व्यवस्थापन पाहणे, ताब्यात घेणे.

३३. बँकेच्या उद्देशास अनुसरुन व तिचे वाढीस उत्तेजक अशा व्यवसायांपैकी आवश्यक व्यवसाय करणे.

३४. रिझर्व्ह बँकेच्या परवानगीनुसार इतर कोणत्याही स्वरुपाचा व्यवसाय करणे.

५. **निधी :**

अ) खालील साधनांनी निधी उभारता येतील.

१. कोणत्याही प्रकारचे भाग भांडवल

२. प्रवेश फी

३. वर्गणी

४. ठेवी

५. कर्जे, कॅश क्रेडीट, ओव्हर ड्राफ्ट व उचल

६. देणग्या, अनुदान व मदत

७. नफा

८. बाहेरील व्यावसायिक कर्जे (ई.सी.बी.)

९. तारणी/विनातारणी बॉन्डस्

१०. पुनर्वित्त, हमीपत्रे (लेटर ऑफ क्रेडीट)

११. नॉन कन्व्हर्टिबल डिबेंचर्स अथवा रिझर्व्ह बँकेच्या परवानगीनुसार इतर कोणतीही साधने.

१२. निबंधक व रिझर्व्ह बँक यांच्या परवानगीने वेळोवेळी उपलब्ध होणारी इतर साधने.

ब) बँकेने उभारलेले निधी, बँकेने ठरविलेली उद्दीष्ट्ये पूर्ण करणेसाठी वापरण्यात येतील.

७. **कर्ज उभारण्याची मर्यादा :**

कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये बँकेची बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा कायदा, नियम यानुसार नियंत्रीत राहील व निबंधक यांचे परवानगीनुसार राहील.

८. **भाग भांडवल**

बँकेचे अधिकृत भागभांडवल रु.१०,००,००,०००/- (अक्षरी रु. दहा कोटी फक्त) इतके असून ते रु.२५/- दर्शनी किंमतीच्या ४० लाख इतक्या भागात विभागलेले असेल. मात्र सभासद होण्यासाठी इच्छुकांने सभासद अर्जासोबत कमीत कमी शंभर भागाची पूर्ण रक्कम भरलेली असली पाहिजे.